

देगलूर : चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर. या वेळी विविध कार्यक्रम घेण्यात आले.

# 'संत-महानुभाव साहित्याने वारसा जोपासला'

**देगलूर, ता. ४ (बातमीदार)** : प्राचीन काळापासून समाजमन घडविण्याचे कार्य साहित्य करीत असून साहित्य व समाज यांचे अतूट नाते आहे. बहुसांस्कृतिक बेटांचा समूह भारतीय संस्कृतीमध्ये दिसून येतो. देगलूर शहराला बहुसंस्कृतिक वारसा असनू येथे येथे तीन संस्कृतीचा संगम झाला आहे. त्यामुळे येथील समाज व भाषा हा अभ्यासाचा महत्वपूर्ण विषय आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध समीक्षक डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. ते देगलूर महाविद्यालय व स्वारातीम विद्यापीठ यांच्या संयुक्तविद्यमाने आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात उद्‌घाटक व बीजभाषक म्हनून बोलत होते.

चर्चासत्र उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर हे होते. प्रारंभी चर्चासत्राचे उद्‌घाटनप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलीत करण्यात आले व गौतम भालेकर यांनी स्वागत गीताने स्वागत केले. प्रास्ताविकपर विचार प्राचार्य मोहन खताळ यांनी मांडले. कार्यक्रम यशस्वी करन्यासाठी प्राचार्य डॉ. मोहन खताळ, डॉ. विठ्ठल जंबाले, डॉ. संतोष येरावार, प्रा.ए.आर. डांगे, डॉ. लक्ष्मण सुदाम, डॉ. विनय भोगले, डॉ. सर्जेराव रणखांब, डॉ. राजेश्वर दुडुकनाळे, डॉ. व्यंकट खंदकुरे, उपप्राचार्य एम.एम. चमकुडे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील यांच्यासह विविध समितीतील प्राध्यापक, कर्मचारी विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner